**प्रकल्प प्रवर्तक मे. प्रो ग्रो बायो प्रायव्हेट लिमिटेड, गट नं १५८, शिव पट्टी, पियुष शुगर फॅक्टरीजवळ, गाव - तांदळी वडगाव, तालुका व जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या इथाइल ॲसिटेट ६५ मेट्रीक टन/प्रतिदिन क्षमतेच्या प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मे. प्रो ग्रो बायो प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. १५८, शिव पट्टी, पियुष शुगर फॅक्टरीजवळ, गाव - तांदळी वडगाव, तालुका व जिल्हा - अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या इथाइल ॲसिटेट ६५ मेट्रीक टन/प्रतिदिन क्षमतेच्या प्रस्तावित प्रकल्पा संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार , दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी निवासी उप जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

उप- प्रादेशिक अधिकरी तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

उप- प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. प्रो ग्रो बायो प्रायव्हेट लिमिटेड, गट नं १५८, शिव पट्टी, पियुष शुगर फॅक्टरीजवळ, गाव - तांदळी वडगाव, तालुका व जिल्हा - अहिल्यानगर, महाराष्ट्र, यांच्या इथाइल ॲसिटेट ६५ मेट्रीक टन/प्रतिदिन क्षमतेच्या प्रस्तावित प्रकल्पा संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना

जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ११.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-३१/२०२५, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२५०४२१ एफटीएस ०११२ दिनांक - २१/०४/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी, अहिल्यानगर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी - नाशिक | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहिल्यानगर | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक - ३१-०३-२०२५ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर,

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर,

३) जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, अहिल्यानगर,

४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

५)  सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

६)  प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक.

७)  उप विभागीय कार्यालय, नगर-नेवासा, अहिल्यानगर.

८)  तहसीलदार, तहसील कार्यालय, अहिल्यानगर,

९)  संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

१०)  ग्रामपंचायत कार्यालय - वाळकी, राळेगाव, सारोळा कासार, तांदळी वडगाव, खडकी, साकत, चिखली, तालुका व जिल्हा- अहिल्यानगर.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांना प्रकल्पास हरकती/समर्थन करणारे एकही निवेदन प्राप्त झालेले नाहित.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी व तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री. अभिलाष रावसाहेब घिगे, रा. तांदळी वडगाव, ता. जि. अहिल्यानगर:-**

यांनी या प्रकल्पाच्या संदर्भात आयोजक व पर्यावरण सल्लागार यांनी दिलेल्या माहिती सांगितल्याबद्दल आभार व्यक्त केले. या गावात प्रकल्प आणल्यामुळे गावात काही प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे याबद्दल श्री. संजय आंबोले पाटील सरांचे आभार व्यक्त केले. या कंपनीच्या माध्यमातून सी एस आर फंड मिळणार आहे तो अधिकाधिक या गावाच्या सामाजिक कार्यासाठी खर्च करावा अशी सुचना व अपेक्षा करण्यात आली.

**२) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिक्षण संस्था, जि. नालगोंडा, तेलंगणा राज्य:-**

श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी सांगितले की, ते सर्वात प्रथम असे पर्यावरणवादी आहेत की, औद्योगिक विकासाला पाठिंबा देतात तसेच या प्रकल्पासाठी व्यवस्थापनेला माझ्याकडून शुभेच्छा. यांच्यामते भारतातील या

टप्प्यावर बेरोजगारी हे प्रमुख प्रदूषण आहे. सर्व राज्य सरकार व केंद्रीय सरकार दरवर्षी अंदाजे ५ ते ६ लाख लोकांना रोजगार देत आहेत. अंदाजे १ कोटी लोक रोजगारासाठी बाजारात दरवर्षी येतात. उर्वरित ९५ लाख लोक औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून आहे. यामुळे मी प्रदूषण नियंत्रण मंडळाला या उद्योगाला त्याची बिनशर्त परवानगी देण्याची विनंती करत आहे. सरकारी नियमानुसार ३३ टक्के वृक्षारोपन करणे गरजेचे आहे. पण प्रकल्प प्रस्थापकांनी ३५ टक्के वृक्षारोपन करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल व्यवस्थापनाचे अभिनंदन.

वृक्षारोपन करताना सामान्य वनस्पती ऐवजी फळे देणारी व औषधी वनस्पती लावा ते पर्यावरणासाठी खूप उपयुक्त आहे. तसेच भुजल पातळी वाढविण्यासाठी पावसाळ्यात पडणाऱ्या २ ते ४ लि. पाणी साठवणे महत्वाचे आहे. त्यासाठी सी एस आर निधी वापरण्याबाबत सुचविले आहे.

त्यांनी व्यवस्थापनेची गुंतवणूक १२ कोटी रुपये असून अप्रत्यक्ष २५ बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याबाबत अभिनंदन केले व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने या उद्योगाला बिनशर्त परवानगी देण्याची पुनश्च विनंती केली.

**३) श्री. व्यंकटेश, पर्यावरणवादी, जि. नालगोंडा, तेलगंणा:-**

त्यांनी दिवसाच्या शुभेच्छा देत स्वत: पर्यावरण प्रेमी असल्यापैकी सांगितले व या प्रकल्पाच्या प्रस्तावकाचे कौतुक करत यामुळे २५ सदस्यांना रोजगार मिळणार असल्याचे नमुद केले.

तसेच औषधी वनस्पती लागवड करण्याचे सूचविले आहे व सदर प्रस्तावाला आपला पाठिंबा दर्शविला आहे.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या हरकतींना स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पर्यावरण जाहिर सुनावणीला उपस्थित जनतेला आश्वासित करण्यात आले की, प्रकल्प ग्रस्तावर जो सी एस आर फंड आहे तो स्थानिक ग्रामपंचायतीसोबत सल्ला मसलत करून त्यांच्या गरजेनुसार सी एस आर फंड देण्यात येईल तसेच कंपनीचा परिसरालगत असलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावण्यात येतील त्यामुळे वाहनापासून होणारे ध्वनीप्रदुषण कमी होण्यास मदत होईल.

त्यावेळी मा. अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने घेतलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात आली आहे. तसेच सदरील जाहीर लोकसुनावणीचे फोटो व व्हिडीओ रेकॉर्डिंग सहीत पुढील कार्यवाहीसाठी शासनास सादर करण्यात येईल.

सदस्य. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

प्राप्त **१** लेखी निवेदन/पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.

**(चंद्रकांत न. शिंदे)**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहिल्यानगर

**(लिंबाजी सु. भड)**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळ,
नाशिक

**(अरुण उंडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, अहिल्यानगर